Reviewed Referred and
UGC Listed Journal
Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भारतातील दहशतवाद, नक्षलवादाचे एक ऐतिहासिक अध्ययन<br>**प्रा. डॉ. गौतम ए. शंभरकर** | १-५ |
| २ | योगशास्त्राची वाढती लोकप्रियता आणि उपयुक्तता<br>**डॉ. बी. एम. सावरकर** | ६-८ |
| ३ | तेलंगणा प्रादेशिकवादाचा भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेवर होणारा परिणाम<br>**घन आनंद लक्ष्मीकांत**<br>**डॉ. विजय यशवंतराव जाधव** | ९-१४ |
| ४ | तलाक कायदा - अपुरे संरक्षण<br>**डॉ. भालेराव जी. पी** | १५-१६ |
| ५ | नक्षलवादाचा आदिवासींच्या आर्थिक जीवनावरील प्रभाव<br>**डॉ. साळुंके जयसिंग ज्ञानदेव** | १७-१९ |
| ६ | महिला पोलिस आणि लिंगभाव<br>**प्रा. काळे आर. बी.**<br>**प्रा. मोकासरे जी. टी.** | २०-२३ |
| ७ | शेतकरी आत्महत्या देशासमोरील एक गंभीर आव्हान<br>**प्रा. डॉ. दिलीप जानकीराम धोंगडे** | २४-२८ |
| ८ | साधना बालकुमार दिवाळी अंक २०१८ मधील कथांमधून आशयातून संस्कारित होणाऱ्या गाभाघटकांचा व मूल्यांचा अभ्यास<br>**डॉ. छाया दिलीप महाले** | २९-३४ |
| ९ | शेतकरी आत्महत्या : कारणे, उपाय व समाजकार्य मध्यस्थी<br>**सहा. प्रा. विकास एन. अडयाळकर** | ३५-३९ |
| १० | स्वयं सहायता बचत गट महिला सक्षमीकरणाचे माध्यम<br>**डॉ. गणेश आर. गाडेकर** | ४०-४३ |
| ११ | स्त्रियांच्या सक्षमिकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान<br>**प्रा. देविदास नागोराव रिठे** | ४४-४६ |
| १२ | सुखा एक पर्यावरणीय प्रकोप<br>**प्रा. कांबळे डी. एम.** | ४७-५० |

# ११. स्त्रियांच्या सक्षमिकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

प्रा. देविदास नागोराव रिठे
श्री. शिवाजी महाविद्यालय, परभणी.

**प्रास्ताविक**

भारताच्या प्राचीन वैभवशाली संस्कृतीत स्त्रियांना अत्यंत मानाचे स्थान आहे परंतू प्रत्यक्षात मात्र स्त्रियांना समाजात दुय्यम दर्जाची वागणूक मिळते. भारतीय संस्कृती ही पुरुष प्रधान असल्यामुळे स्त्रियांवर अनेक प्रकारचे बंधने लादल्या गेली हिंदु धर्म संहितेने तर स्त्रियांना गुलामच बनविले आहे. त्यांच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यात आधुनिक काळात सुरुवात झाली अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी प्रयत्न केले परंतू ख–या अर्थाने स्त्रियांचे सक्षमिकरण करण्यासाठी त्यांना पुरुषाच्या बरोबरीने सर्व अधिकार मिळवून देण्यासाठी डॉ.बाबासाहेबांनी प्रयत्न केले. त्यांचा स्त्रि विषयक दृष्टिकोण व्यापक स्वरुपाचा होता. माणुस म्हणून स्त्रियांना सर्वच क्षेत्रात समान संधी, स्वातंत्र व समान हक्क मिळाले पाहीजे यासाठी डॉ. बाबासाहेबांनी राज्यघटना व हिंदू कोड बीलच्या माध्यमातून प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**उद्दिष्टये**

- डॉ. बाबासाहेबांचे स्त्रिविषयक विचार जाणून घेणे
- डॉ. बाबासाहेबांनी स्त्रियांसाठी केलेले कार्य समजून घेणे
- डॉ. बाबासाहेबांच्या हिंदुकोडबील विषयी जाणून घेणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तूत शोध निबंधासाठी दुय्यम संदर्भ साधनांचा वापर केला डॉ. बाबासाहेबांचे स्त्रि विषयक कार्य अभ्यासत असतांना त्यांनी दिलेली भाषणे स्त्रि उध्दारासाठी मांडलेले विधेयक या व्दारे त्यांचे योगदान स्पष्ट करता येईल.

**स्त्रियांची अवस्था**

भारतीय समाज व्यवस्थेवर मनुचा फार मोठा प्रभाव आहे म्हणून डॉ. बाबासाहेब मनुला जिवंत भुतकाळ मानतात मनुने वर्णाच्याच आधारावर समाजाचे विभाजन केले नसून लिंगांच्या आधारावर ही समाजाचे विभाजन केले. ज्या प्रमाणे मनुने शुद्र–अस्पृश्यांना धर्म, संपत्ती व शिक्षणाचा अधिकार नाकारला तसाच स्त्रियांनाही नाकारला त्याने **"न स्त्रि स्वंतत्र महती"** चा आदेश देऊन स्त्रियांना वेदाध्यायनापासून वंचित ठेवले शिवाय त्यांच्या धार्मिक विधीवर ही बंधने आणली पतीशी समर्पीत भाव हाच स्त्रि धर्म ठरवण्यात आला. आधुनिक काळापर्यंत तर स्त्रियांचा दर्जा अधिकच खालावत गेला. तीच्यावर रुढी, परंपरेच्या नावाखाली अनेक बंधने लादल्या गेली. ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात आधुनिक शिक्षणाला सुरुवात झाली. नविन मुल्यांची भारतीयांना ओळख झाली आणि स्त्रियांना त्यांच्या पशुतुल्य आयुष्यातून बाहेर काढण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी प्रयत्न केले. त्यामध्ये सुरुवातीला म.फुले व सावित्रीबाई

फुले यांचे स्त्रि शिक्षणाचे कार्य तर युगप्रवर्तकच होते. त्यानंतर स्त्रियांना सक्षम बनविण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी बहुमुल्य योगदान दिले.

**डॉ. बाबासाहेबांचे स्त्रि विषयक विचार**

स्त्रियांकरीता व्यापक लढा उभारुन डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक क्रांती घडवून आणली पुरुषांबरोबर स्त्रियांचीही प्रगती झाली पाहिजे हा विचार मांडतांना डॉ. बाबासाहेब म्हणतात की, ज्या देशातील 50% स्त्रिया स्वतंत्र नसतील तर तो देश अर्धा अधिक गुलामच असतो. डॉ. बाबासाहेबांनी आपला निबंध हिंदू स्त्रियांची उन्नती व अवनती यामध्ये म्हटले आहे की, स्त्रियांचे सर्वात जास्त नुकसान मनुने केले आहे मनुस्मृती नुसार स्त्रियांना वडीलांच्या बंधनात, तारुण्यात पतीच्या ताब्यात आणि म्हातारपणी मुलांच्या नियंत्रणात राहावे लागते म्हणूनच हजारो वर्षापासून स्त्रियांना सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतीक व राजकीय परावलंबित्व पत्करावे लागून पुरुषांच्या गुलामगिरीत खितपत पडावे लागले. यातून स्त्रियांना जर बाहेर काढायचे असेल, पुढची पीढी सुधारायची असेल तर मुलींना शिक्षण दिल्या शिवाय पर्याय नाही. असे डॉ.बाबासाहेबांचे मत होते. स्त्रियांना स्वावलंबी बनविण्यासाठी शिक्षण, वसतीगृह, स्कॉलरशिपची व्यवस्था करण्यात यावी असेही डॉ.बाबासाहेब म्हणाले.

**स्त्रि सक्षमीकरणाचे कार्य**

देशातील स्त्रिमुक्ती चळवळ बुध्द, कबीर व फुले या तीन गुरुंच्या वैचारीकतेतून तयार झाली. त्यांच्याच विचारांचा प्रभाव डॉ. बाबासाहेबांवर पडला त्यांनी जागतिक स्त्रि विषयक प्रश्नांचा अतिशय सुक्ष्मतेने अभ्यास केला. पाश्चात्य देशातील स्त्रियांची स्थिती व भारतीय स्त्रियांच्या स्थितीची तुलना केली व पाश्चात्य देशातील स्त्रियांप्रमाणे आपल्या देशातील स्त्रियांची स्थिती सुधारली पाहीजे त्या स्वतंत्र झाल्या पाहिजे असे डॉ. बाबासाहेबांनी मनात घेउन स्त्रि सुधारणा चळवळीच्या कार्याला सुरुवात केली.

डॉ. बाबासाहेबांनी स्त्रि मुक्तीसाठी प्रबोधन व कायदा या दोन मार्गाचा अवलंब करुन शिक्षणाचा पुरस्कार केला. डॉ. बाबासाहेबांनी आपल्या सभेच्या माध्यमातून स्त्रियांना स्वाभिमान व स्वावलंबाची जाणीव करुन दिली. डॉ. बाबासाहेब म्हणाले स्त्रियांनी आपली जबाबदारी ओळखावी कारण त्यांच्या प्रगतीवरच समाजाची प्रगती अवलंबून आहे. स्त्रियांनी पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून लढले पाहीजे असे विचार त्यांनी स्त्रियांमध्ये रुजविले.

डॉ. बाबासाहेब इ.स. 1942 ते इ.स. 1946 दरम्यान ब्रिटिश सरकारच्या कार्यकारी मंडळात श्रममंत्री असतांना त्यांनी स्त्रि कामगारांसाठी मोठे कार्य केले स्त्रियांचे वेतन, रजा, प्रसूतीरजा व कामाचे तास या संदर्भात अनेक कायदे केले व त्यांना सक्षम करण्याचा प्रयत्न केला.

**हिंदु कोडबिल व स्त्रि सक्षमिकरण**

स्त्रियांचा सामाजिक व आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी राज्यघटनेच्या निर्मिती नंतर हिंदु कोडबील विधेयक तयार केले. ते खऱ्या अर्थाने स्त्रि स्वातंत्र्याचा जाहीरनामा होता. हे बील एका जातीसाठी नसून संपूर्ण हिंदु स्त्रियांच्या हक्कासाठी, उन्नतीसाठी व विकासासाठी होते. ते डॉ. बाबासाहेबांनी अत्यंत परिश्रम पुर्वक तयार केले होते. या बीलामुळे स्त्रियांवरील अन्याय अत्याचाराला आळा बसणार होता. डॉ. बाबासाहेबांनी निरनिराळ्या हिंदु संस्थांचा प्रतिनिधीशी, शेकडो पंडीतांशी चर्चा करुन स्त्रि–पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी, हिंदु स्त्रियांची नाकेबंदी दुर करण्यासाठी आणि विवाह व वारसा हक्काच्या नियमात बदल करण्यासाठी हिंदु कोडबील तयार केले है

बील संसदेत 1948 मध्ये सादर करण्यात आले. परंतू त्याच्यावर चर्चा 1951 मध्ये घडून आली या विधेयकामध्ये स्त्रियांसाठी विविध अधिकाराच्या तरतुदी करण्यात आल्या होत्या त्यामध्ये 1) स्त्रियांना घटस्फोटाचा अधिकार, 2) घटस्फोटीत स्त्रियांना पोटगीचा अधिकार, 3) पहिली पत्नी जिवंत असतांना दुस–या विवाहास बंदी 4) वडीलांच्या संपत्तीमध्ये मुला प्रमाणेच मुलीनाही हक्क 5) आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहास मान्यता इ. परंतू हिंदु कोडबीलास अनेकांचा विरोध होता कारण हिंदु समाजातील जीर्णमतवादी इतर कोणतीही गोष्ट मान्य करतील पण त्यांची समाज रचना, स्त्रियांची, शुद्रांची गुलामी यात त्यांना कोणताही बदल नको आहे. याची डॉ. बाबासाहेबांना कल्पना होती. या बीलाला विरोध करणा–यांना डॉ. बाबासाहेबांनी जाहीर सभामधून व खाजगी चर्चेतून सडेतोड उत्तर दिले.परंतू या बीलाला जीर्णमतवाद्यांनी विरोध करण्याचे व चिडण्याचे कारण त्यांच्या मते हे बील म्हणजे हिंदु धर्मावर घातलेला घाला होय, आणि हिंदु स्मृती शास्त्रात फेरफार घडवून आणनारा हा अस्पृश्य म्हणजे मोठा अनर्थ होय.

हिंदु कोडबील पुर्णतः पास होण्याची शक्यता नसल्यामुळे डॉ. बाबासाहेबांनी 26 सप्टेंबर 1951 रोजी आपल्या कायदामंत्री पदाचा राजीनामा दिला काही काळानंतर ते बील पास झाले आणि स्त्रियांच्या विकासाच्या प्रगतीचा मार्ग मोकळा झाला.

## निष्कर्ष

स्त्रियांच्या समाजिक व आर्थिक प्रगतीच्या आड येणा–या चालीरीती, रुढी, परंपरा नष्ट करुन त्यांनाही पुरुषांच्या बरोबरीने समान संधी व अधिकार मिळावा, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा या हेतूने डॉ. बाबासाहेबांनी सामाजिक चळवळी बरोबर स्त्रियांच्या हक्कासाठी अथक प्रयत्न केल्याचे दिसून येते तसेच हिंदु धर्मातील स्त्रियांना धार्मिक परंपरेनुसार जे अधिकार नाकारले गेले होते त्यातून स्त्रियांना मुक्त करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी हिंदु कोडबील संसदेत मांडले हे त्यांनी स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी केलेले क्रांतीकारी स्वरुपाचे कार्य होते. त्यामुळेच ख–या अर्थाने स्त्रिया ह्या स्वतंत्र झाल्या आजच्या स्त्रिया जे काही प्रगती करत आहेत त्यामागे डॉ. बाबासाहेबांचे कार्य होते हे मान्य करावे लागेल.

## संदर्भ सुची

1. गांजरे मा. फ., डॉ. बाबासाहेब आंबेडकराची भाषणे – खंड– 4, अशोक प्रकाशन नागपूर, 1976
2. खैरमोडे चा. भ., भीमराव रामजी आंबेडकर चरित्र, खंड दहावा, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, 1989
3. मुन मिनाक्षी (संपा), फुले आंबेडकरी स्त्रि चळवळ, समता प्रकाशन नागपूर, 2002
4. प्रा. मुलजाधव सुशिला, भगवान बुध्द, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय स्त्री, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, 2006
5. कांबळे सरोज, मनुस्मृती, स्त्रिया आणि आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले प्रकाशन, नाशिक
6. खैरमोडे चा. भ., डॉ. आंबेडकर आणि हिंदु कोडबील, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, 2010.